ब्लॉक चेन तंत्रज्ञानाचा शासनाच्या कामकाजात वापर करणे बाबत व कार्यकारी गटाची (Working Group) स्थापना.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्र. मातंस २०१८/ प्र.क्र. ४५/से-१/का.३९

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक:-११ एप्रिल, २०१९.

प्रस्तावना:-

शासकीय कामकाजात सुलभता व पारदर्शकता आणण्यासाठी माहिती तंत्रज्ञान संचालनालयामार्फत नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याच्या दृष्टीने ब्लॉक चेन तंत्रज्ञानाचा वापर शासकीय कामकाजात करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या अनुषंगाने पहिल्या टप्प्यात स्टार्टअप संस्थांनाकडून वेगवेगळया क्षेत्रामध्ये तयार केलेल्या Proof of Concept (PoC) चे सादरीकरण विभागामध्ये घेण्यात आले आहे. त्यामध्ये भूमि अभिलेख, आरोग्य विषयक अभिलेख, वाहन नोंदणी आणि दस्तऐवजांचे व्यवस्थापन या क्षेत्रातील पाच स्टार्टअप संस्थानांनी सादर केलेल्या Proof of Concept ची निवड करण्यात आली होती. या संस्थानी केलेल्या Proof of Concept शासकीय कामामध्ये वापर व्हावा या हेतूने प्रधान सचिव (मातं) यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी गटाची (working group) स्थापना करण्याचा विचार शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

१. शासकीय कामकाजात सुलुभता व पारदर्शकता आणण्यासाठी सर्व मंत्रालयीन विभाग व क्षेत्रीय कार्यालयात ब्लॉक चेन तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यात यावा, असा निर्णय या अन्वये घेण्यात येत आहे.

२. ब्लॉक चेन या तंत्रज्ञानाचा वापर शासकीय कामकाजात करण्याच्या हेतूने पहिल्या टप्प्यात भूमि अभिलेख, आरोग्य विषयक अभिलेख, वाहन नोंदणी आणि दस्तऐवजांचे व्यवस्थापन या क्षेत्रांची निवड करण्यात आली आहे. त्याकरीता खालीलप्रमाणे कार्यकारी गटांची स्थापना करण्यात येत आहे.

महसूल व वन विभाग - भूमि अभिलेख

१.	अप्पर मुख्य सचिव (महसूल) , महसूल व वन विभाग , मंत्रालय, मुंबई.	अध्यक्ष
२.	प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) , मंत्रालय, मुंबई.	उपाध्यक्ष
३.	संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई.	सदस्य
४.	मुख्य कार्यकारी अधिकारी, महाआयटी, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड,मुंबई.	सदस्य
५.	एन.आय.सी.चे प्रतिनिधी, मंत्रालय, मुंबई.	सदस्य
६.	सह सचिव/उप सचिव/महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.	सदस्य
७.	संचालक, भूमि अभिलेख, फोर्ट,मुंबई-४०००२३.	सदस्य
८.	संचालक, भूमि अभिलेख (उपनगर), बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१.	सदस्य
९.	संचालक भूमि अभिलेख ,विलेपार्ले (प.),मुंबई ४०००४७.	सदस्य
१०.	विषयाशी संबंधित असलेल्या कार्यालयाचे अधिकारी (प्रतिनिधी)	सदस्य
११.	उप सचिव/अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या. ३९), मंत्रालय ,मुंबई.	सदस्य

<u>सार्वजनिक आरोग्य विभाग</u> - आरोग्य विषयक अभिलेख

१.	प्रधान सचिव ,सार्वजनिक आरोग्य विभाग,नवीन मंत्रालय ,मुंबई.	अध्यक्ष
२.	प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान), मंत्रालय ,मुंबई	उपाध्यक्ष
३.	संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय ,मुंबई.	सदस्य
४.	मुख्य कार्यकारी अधिकारी, महाआयटी, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड,मुंबई.	सदस्य
५.	एन.आय.सी.चे प्रतिनिधी, मंत्रालय, मुंबई.	सदस्य
६.	सह सचिव/उप सचिव/सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय, मुंबई.	सदस्य
७.	संचालक, राष्ट्रीय आरोग्य संचालनालय, मुंबई-४००००१.	सदस्य
८.	विषयाशी संबंधित असलेल्या कार्यालयाचे अधिकारी (प्रतिनिधी)	सदस्य
९.	उप सचिव/अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या. ३९), मंत्रालय ,मुंबई.	सदस्य

<u>गृह विभाग (परिवहन)</u> - वाहन नोंदणी

१.	प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय ,मुंबई.	अध्यक्ष
२.	प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) , मंत्रालय, मुंबई.	उपाध्यक्ष
३.	संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई.	सदस्य
४.	आयुक्त परिवहन, शासकीय वसाहत,वांद्रे - ४०००५१.	सदस्य
५.	मुख्य कार्यकारी अधिकारी, महाआयटी, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड,मुंबई.	सदस्य
६.	एन.आय.सी.चे प्रतिनिधी, मंत्रालय, मुंबई.	सदस्य
७.	सह सचिव/उप सचिव/गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.	सदस्य
८.	विषयाशी संबंधित असलेल्या कार्यालयाचे अधिकारी (प्रतिनिधी)	सदस्य
९.	उप सचिव/अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या. ३९), मंत्रालय ,मुंबई.	सदस्य

<u>शालेय शिक्षण-</u> दस्तऐवजांचे व्यवस्थापन

१.	अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय ,मुंबई.	अध्यक्ष
२.	प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान), मंत्रालय ,मुंबई.	उपाध्यक्ष
३.	संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय ,मुंबई.	सदस्य
४.	मुख्य कार्यकारी अधिकारी, महाआयटी, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड,मुंबई.	सदस्य
५.	एन.आय.सी.चे प्रतिनिधी, मंत्रालय, मुंबई.	सदस्य
६.	सह सचिव/उप सचिव/शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.	सदस्य
७.	शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजी नगर पुणे-४११००४.	सदस्य
८.	विषयाशी संबंधित असलेल्या कार्यालयाचे अधिकारी (प्रतिनिधी)	सदस्य
९.	उप सचिव/अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या. ३९)	सदस्य

३. कार्यकारी गटाच्या कार्यकक्षा खालील प्रमाणे असतील :-

अ) ब्लॉक चेन प्रणालीचा वापर शासकीय कामकाजात करण्यात येईल याची निश्चिती करणे.

आ) कार्यकारी गट ब्लॉक चेन प्रणालीचा वापर होताना बेस्ट प्रक्टीसेस आणि ऑपरेटिंग मॉडेलचा उपयोग करण्यात येत आहे याची सुनिश्चिती करणे.

इ) पायलट प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी क्षेत्र व कार्यकक्ष निश्चित करणे.
ई) स्टार्टअप संस्थांनी केलेल्या कामाचा आढावा व प्रगतीचे मुल्यांकन करणे.
उ) शासनाच्या सर्व कायदे व नियम यांचे अनुपालन करण्यात येईल याची निश्चिती करणे.
ऊ) शासनाच्या ईगर्व्हन्स पॉलिसीनुसार डेटा /डेटाबेस यांची सुरक्षितता निश्चित करणे.
ए) पायलट प्रकल्पासंदर्भात उद्भवणारी आव्हाने व जोखीम कमी करण्याचा प्रयत्न करणे.
ऐ) पायलट प्रकल्पाच्या व्यवस्थापनासाठी तज्ञ सल्लगारांची नेमणूक करणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१९०४१११५२६२४१२११ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Jyotsna Mukund Madekar

Digitally signed by Jyotsna Mukund Madekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4933ea9398d593ec3e965535e1a043d4fa180d8a396eba4219125dd51149b794, serialNumber=fffb2fb2ba84f5fea3e120c68b4f4fa5519c8d354b493025c20611a3be614705, cn=Jyotsna Mukund Madekar
Date: 2019.04.11 16:58:19 +05'30'

(ज्योत्स्ना मु. माडेकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) सर्व सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्यसचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२) प्रधान सचिव (मातं), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३) संचालक,माहिती तंत्रज्ञान संचालनालय,सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४) आयुक्त (परिवहन) नवीन प्रशासन भवन, ४ था मजला, रुम नं. १३, डॉ. बाबसाहेब आंबेडकर उद्यान, शासकीय वसाहत, वाद्रे, मुंबई- ४०००५१.
५) सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, जी.टी. रुग्णालय, नविन मंत्रालय, मुंबई-४००००१.
६) सह सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७) सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
८) संचालक, राष्ट्रीय आरोग्य संचालनालय, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य भवन, ३रा मजला, सेंन्ट जॉजस कंपाऊड, पि डिमेलो रोड, मुंबई-४००००१.
९) संचालक, भूमि अभिलेख,डी.डी बिल्डींग, खोली क्र-१०८, पहिला मजला,जूने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट,मुंबई-४०००२३.
१०) संचालक, भूमि अभिलेख (उपनगर),प्रशासकीय इमारत,१० वा मजला, शासकीय वसाहत, चेतना कॉलेज जवळ, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१.
११) संचालक भूमि अभिलेख, १०६, एसव्ही रोड, एलआयसी कॉलनी, सुरेश कॉलनी, विलेपार्ले (प), मुंबई-४०००५१.
१२) शिक्षण संचालक,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, सर्वे नं ८३२ -अ,फायनल प्लॉट नं. १७८ व १७९, भांभूरडा शिवाजी नगर,पुणे-४११००४.
१३) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाआयटी, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड,मुंबई.४००००५
१४) राज्य सूचना विज्ञान अधिकारी,नॅशनल इंफोरमॅटीक सेंटर, मुंबई.३२
१५) प्रधान सचिव (मातं), यांचे स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१६) संचालक (मातं), यांचे स्वीय सहायक,सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१७) निवड नस्ती.